PYAR FOUNDATION
Partnering with You for Animal Rights

ADOPT A PET
Life is better with them

4 लेग्ड फरी बालक दत्तक फॉर्म

तुम्ही कुटुंबात एक नवीन सदस्य आणण्याचा निर्णय घेतला आहे याचा आम्हाला खूप आनंद झाला आहे. हा तुमचा तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा निर्णय आहे. अपत्य झाल्यासारखा. किंवा नवीन घर खरेदी केल्या सारखा . आणि या नवीन प्रवासात तुम्ही कोणती जबाबदारी घेणार आहात हे समजून घेण्यासाठी आम्ही तुम्हाला मदत करू इच्छितो. तुमच्यापैकी काहींच्या कडे अपत्यांच्या रूपात प्राणी असतील आणि काहींच्या कडे नसतीलही. परंतु, आम्ही तरी ही प्रक्रिया, सूचना आणि सुरक्षेच्या उपायांची पुनरावृत्ती विमानांत दिल्या जाणाऱ्या सूचनांप्रमाणे करू. यापैकी काही प्रश्न अडचणीत आणणारे आहेत. यामुळे नाही की आमचा तुमच्यावर विश्वास नाही म्हणून. पण तुम्ही जो निर्णय घेणार आहात त्याबद्दल तुम्हाला विश्वास आहे, याची खात्री करण्यासाठी. कारण ज्या पिल्लाला तुम्ही घरी घेऊन जाणार आहात ते काही फक्त व्हॅलेंटाईन डे किंवा नवीन वर्षाची भेट नाही. पिल्लू ही आयुष्यभराची जबाबदारी आहे. एखाद्या मानवी अपत्याप्रमाणेच. यात आहे शालेय शिक्षण, भोजन, प्रशिक्षण, अभ्यासक्रमेतर उपक्रम, आरोग्याशी संबंधित समस्या, अपघात आणि त्रागा. हे मानवी बाळांपेक्षा जास्त कठीण आहे कारण ते कधीही बोलू शकणार नाहीत. म्हणून आपण त्यांना अधिक चांगले जाणून घेणे आणि त्यांच्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. जरी ते तुम्हाला जितके प्रेम देतील त्याची तुलना तुम्ही त्यांना देत असलेल्या प्रेमाशी कधीच होऊ शकत नाही तरी हा फॉर्म तुम्हाला पुढील अनेक वर्षांसाठी तयार करतो|

आमच्या स्वयंसेवकांना बचाव करण्याचा, उपचार करण्याचा, पालनपोषण आणि दत्तक घेण्याचा अनेक वर्षांचा अनुभव आहे. हा फॉर्म याच अनुभवाच्या आधारे तयार केला गेला आहे ज्यामुळे पिल्लाला आयुष्यभर चांगले घर मिळणे सुनिश्चित होईल. ही प्रक्रिया मानवी मूल दत्तक घेण्याइतकीच काटेकोर आहे.

तुम्हाला हे देखील समजून घेणे आवश्यक आहे की कुत्रा, मांजर किंवा अन्य कोणताही प्राणी फर्निचर, तारा, जोडे, लिनेन इ. चघळेल. जोपर्यंत ते प्रशिक्षित होत नाहीत, तोपर्यंत ते घराभोवती मूत्रत्याग करतील, मलविसर्जन करतील .घरात लहान पिल्लू असण्याचे हे सामान्य धोके आहेत.

.

जर तुम्हाला वाटत असेल की तुम्हाला कोणत्याही प्रश्नांची उत्तरे द्यायची नाहीत, तर आम्हाला प्रक्रिया पुढे न घेऊन जाणे अपरिहार्य होईल. यात वैयक्तिक काहीही नाही! हा फॉर्म भरण्यासाठी थोडा वेळ लागतो. तुम्हांला हवा तेवढा

वेळ घ्या. सर्व प्रश्नांची उत्तरे द्या. यात एक ही प्रश्न अनावश्यक नाही. जर तुम्ही हा फॉर्म पूर्णपणे भरण्यासाठी वेळ काढू शकत नसाल, तर तुम्ही पिल्लासाठीही वेळ काढू शकणार नाही.

आम्ही आशा करतो की हे काम करेल आणि हे पिल्लू तुमच्या जीवनात अधिक आनंद आणू शकेल!

धन्यवाद!

पुनश्च: दत्तक घेण्यासाठी काही अनिवार्य अटी:

1. जर तुम्ही प्रशिक्षक ठेवण्याचा विचार करत असाल तर ते प्रशिक्षणाच्या सकारात्मक पद्धतींमध्ये प्रमाण-पत्र धारक असणे करणे आवश्यक आहे, वेदना किंवा धमकावण्याच्या/शॉक कॉलर पद्धतींमध्ये नाही.
2. तुम्हाला 6 महिन्यांच्या वयात कुत्रा/मांजर न्यूटर करावे लागेल

पाळीव प्राणी दत्तक घेणाऱ्या व्यक्तीला हा फॉर्म भरावा लागेल.

नाव:

वय:

व्यवसाय/व्यवसाय (कामाच्या पत्त्याचा तपशील):

समाज माध्यम आयडी (जर असेल)
फेसबुक आयडी

इन्स्टाग्राम आयडी

तुम्हाला पाळीव प्राणी का दत्तक घ्यायचे आहे?

तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत राहता का?

पत्ता:

स्वतःच्या मालकीचे:

भाड्याचे:

जर भाड्याचे असेल - सोसायटीमध्ये कुत्री ठेवण्याची परवानगी आहे का?

घरात कुत्री असल्यास घरमालकाला काही अडचण तर नाही ना?

तुमचा अनुबंध संपल्यानंतर जर तुम्हाला कुत्री ठेवण्याची परवानगी देणारी सोसायटी/घरमालक नाही मिळाला तर काय पर्यायी व्यवस्था आहे?
जर भाड्याचे घर असेल तर- जेव्हां तुम्ही नवीन जागेत रहायला जाल तेव्हां तुम्हाला तेथील पत्ता आम्हांला कळवणे बंधनकारक आहे.

तुमच्या घराच्या आंतरिक आणि बाह्य सज्जेची छायाचित्रे आणि ध्वनीचित्रफीत पाठवा.

तुम्ही शाकाहारी आहात कि मांसाहारी?

आपत्कालीन (पर्यायी) संपर्क व्यक्ती:
नाव:
पत्ता:
संपर्क क्रमांक:
तुमच्या बरोबर संबंध:

तुमच्याकडे या आधी कुत्रा/मांजर होती का?

जर तुमचे उत्तर ‘होय’ असेल तर:
:
तो/ती न्यूटर केलेली आहे का?

तुमचे पशुवैद्य कोण आहे?

पशुवैद्यांची माहिती:

सध्या असलेला कुत्रा/मांजर जिवंत आहे का?

कुत्रा/मांजर याचे वय आणि लिंग
जर नसेल तर-तो/ती पास कशी झाली?

कुत्रा/मांजर पाळण्याचा अर्थ काय आहे हे तुम्हाला समजते का
तुम्ही तुमचे संशोधन केले आहे का?

कुत्र्याला दिवसातून किमान दोनदा नियमित पणे उघड्यावर फिरायला घेऊन जावे लागते. तुम्ही ते स्वतः करणार आहात की फिरण्यासाठी कुत्रा वॉकर नियुक्त कराल?

जर तुम्ही मांजर पाळत असाल तर घरातील सर्व खिडक्या जाळ्यांनी झाकल्या पाहिजेत.
नसल्यास, तुम्ही त्यांना जाळ्यांनी झाकण्यास तयार आहात का?

तुमच्या कुटुंबात किती लोक आहेत?

कृपया प्रत्येक सदस्याची माहिती द्या.
.
जर कुटुंबात कुणी लहान बालक असेल, तर त्याचे/तिचे वय लिहा.

जर ते ही प्राण्यांना प्रेम करतात का?

घरात कुत्रा/मांजर आणण्याचा कुटुंबात कोणावर या कारणाने दबाव आहे का की बाकीच्यांना कुत्रा/मांजर हवा आहे?
घरात कुणाला कुत्रा/मांजराच्या केसांची एलर्जी आहे का?
जर तुम्ही सिंगल असाल: जेव्हा तुम्ही लग्न कराल आणि तुम्हाला तुमच्या सासरच्या/लग्नाच्या घरी कुत्रा/मांजर ठेवण्याची परवानगी नसेल- तेव्हा कुत्रा/मांजर कुठे जाईल?
जर तुम्ही लग्न झालेले जोडपे/लिव इन असाल: जर तुम्ही विभक्त झालात तर काय होईल-पिल्लू कुणाकडे जाईल?
जर तुम्ही अपत्यविहीन कुटुंब असाल:
तुम्ही/पत्नी गरोदर असताना डॉक्टरांनी जर कुत्रा/मांजर यास बाहेर काढावयाचा सल्ला दिला तर काय - यावर तुमचे काय मत आहे?
तुमची बदली झाली किंवा तुम्ही अन्य देशात गेल्यास कुत्र्याचे/मांजराचे काय होईल?

सुट्टीवर असताना कुत्रा/मांजराची काळजी कोण घेते?

कौटुंबिक आपत्कालीन परिस्थितीत किंवा कुटुंबातील सर्वांना बाहेरगावी जायचे असल्यास  कुत्रा/मांजरासाठी बॅकअप सपोर्ट सिस्टम काय असेल? आम्हाला तुमच्या बॅकअपचा  संपर्क कळवणे आवश्यक आहे.
बॅकअप पर्यायाबरोबर तुमचा संबंध:
दत्तक घेतल्यानंतर तुम्ही पिल्लाला सोडून दिल्यास, तुम्हाला प्रतिदिन ५०० रुपये एक महिन्यासाठी किंवा पिल्लाला दुसरे घर मिळेपर्यंत भरावे लागतील.

तुम्हाला दत्तक घेतलेल्या पिल्लासह तुमच्या कुटुंबाचे/तुमचे व्हिडिओ आणि चित्रे आम्हाला पाठवावी लागतील

सर्वात शेवटी पण महत्त्वाचे, प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्याच्या  कलम 11 प्रमाणे सर्व प्राण्यांबरोबर क्रूरता हा फौजदारी गुन्हा ठरतो.  यासाठी अर्थदंड आणि कारावास अशा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे. भारतीय दंड संहितेत अशाच तरतुदी आहेत. कोणत्याही प्रकारचा अत्याचार करणे, सोडून देणे आणि बंदिवासात ठेवणे हे कायद्यानुसार दंडनीय गुन्हा मानले जाईल. आम्ही तुम्हाला पाळीव प्राण्याचे पालक म्हणून तुमच्या सर्व कायदेशीर अधिकारांबद्दल आणि कर्तव्यांबद्दल माहिती देऊ. आम्ही तुमच्याकडून या नियमांचे पालन करण्याची अपेक्षा करू आणि तुमच्या आजूबाजूला कोणी त्यांचे उल्लंघन करत असल्यास तुम्ही तुमच्या अधिकारांचा वापर करू शकता. हे कायदेशीर दस्तऐवज नाही. पण हो, एकदा तुम्ही हा फॉर्म भरला आणि पिल्लाला घेऊन गेला की, या नियमांचे पालन करण्याची जबाबदारी तुमची आहे. कुत्रा/मांजर यांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांची सुरक्षितता आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी आम्ही सर्व कुटुंबांची नियमित तपासणी करतो. वरीलपैकी कोणत्याही मान्य अटींचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

या पिल्लांना दत्तक देण्याच्या आमच्या इतक्या  वर्षांच्या अनुभवात,आम्ही दत्तक पालकांना कधीकधी हा प्रकार गंभीरपणे न घेताना पाहिले आहे. ते पिल्लाला घरी घेऊन जातात आणि मग काही समस्या निर्माण होतात. मग पिल्लू परत केले जाते किंवा सोडून दिले जाते. मग पिल्लासाठी नवीन घर मिळते. याचा खरोखरच पिल्लावर खूप वाईट परिणाम होतो. त्यांचा  विश्वास ढळतो. आमचा नेहमीचा प्रश्न असा असतो की, तुम्ही मानवी मुलाला असेच परत कराल किंवा सोडून द्याल का ? आम्हाला खात्री आहे की नाही, मग चार पायांच्या पिल्लाबरोबर असे का करता? आम्ही याची खूप गांभीर्याने दखल घेतो आणि आम्हाला खात्री आहे की तुम्ही देखील याचा तितक्याच जबाबदारीने विचार कराल..